# ऋणनिर्देश

"मिरज संस्थानातील प्रजापरिषदेचा लढा: एक राजकीय अभ्यास" हा विषय एम्.फिल्. साठी मी निवडला. या विषयाचा अभ्यास करित असताना गतकाळातील तपशिलवार अभ्यास करणे गरजेचे असल्यामुळे जुन्या कागदपत्रातून उपलब्ध असलेली उपयुक्त माहिती, वृत्तपत्रे, हस्तलिखित कागदपत्रे, अहवाल याचा आधार घटनाचा क्रम जुळवण्याकरिता मी घेतला. त्याचप्रमाणे या विषयाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या पुस्तकांचा ही उपयोग या प्रबंधासाठी केला.

या सर्व संशोधनाचे काम पूर्ण करण्यास ज्यांची सतत प्रेरणा व मार्गदर्शन लाभले, ते माझे मार्गदर्शक, डॉ.अशोक चौसाळकर (प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) यांचे ऋण मी व्यक्त करतो.

दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानच्या राजकीय चळवळीशी घनिष्ठ संबंध असणारे श्री. विश्वनाथ अनंत पटवर्धन (पुणे) यांची अधिक माहिती साठी मी प्रत्यक्ष भेट घेतली. तेव्हा हया विषयासंबंधी त्यांनी अनेक नवी माहिती दिली. तसेच पत्राद्वारे कांही शंकाचे निरसन केले आणि स्वत:जवळील हस्तलिखित कागदपत्रे देऊन मोलाचे सहकार्य केले. त्यामुळे मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

मिरज संस्थानातील प्रजापरिषदेच्या राजकीय चळवळीमध्ये प्रत्यक्षपणे सहभागी झालेले श्री. के.सी. आपटे (मिरज) यांनी या विषयसंदर्भात ब-याचशा सूचना करून तत्कालीन माहिती पुरवली. शोध प्रबंधाचा मसुदा त्यांनी तपासून पाहिला, कांही तपशिलाच्या चुका

दुरुस्त केल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या संशोधनासाठी आवश्यक ती संस्थानकालीन वर्तमानपत्रे, दक्षिण महाराष्ट्र, साप्ताहिक, वगैरेच्या जुन्या फाईली, सांगली येथील श्री.दाणूराव बिनिवाले यांनी उत्साहपूर्वक पुरवल्या. त्यांच्या या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

तसेच या संशोधनासाठी आवश्यक ती माहिती पुरवण्याकरिता, "दैनिक सत्यवादी" कोल्हापूरचे कार्यकारी संपादक श्री.राजकुमार पाटील यांनी "दक्षिण संस्थानचे विशेषांक" पुरवून सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख, डा.वे.वे.कावळेकर यांच्या प्रोत्साहनामुळे हा प्रबंध पूर्ण करण्याची प्रेरणा मिळाली. तसेच डा. गोपाळ गुरु, डा.वासंती रासम, प्रा.सुरेंद्र जोंधळे यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले म्हणून मी त्यांचाही ऋणी आहे.

या ठिकाणी ज्या संस्थेत काम करतो त्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे ऋण नमूद करणे आवश्यक आहे. या संस्थेचे विद्यमान सचिव, मा.प्राचार्य, श्री. अभयकुमार साळुंखे, यांनी या संशोधनाकरिता सतत प्रोत्साहन दिले. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. आर्टस्,कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज, मिरजेचे, माजी प्राचार्य, श्री.अमरसिंह राणे व प्राचार्या, सौ. विजयाताई पाटील यांनी व्यक्तिगत व प्रशासकीय पातळीवर संशोधनासाठी सदैव प्रेरणा दिली व मदत केली त्याबद्दल मी त्यांचा ही अत्यंत आभारी आहे.

या अभ्यासाकरिता, बॅ. खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, शासकीय वाचनालय, पुणे, मिरज विद्यार्थी संघ, वाचनालय मिरज, आर्टस्,कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेजच्या ग्रंथालयांची अत्यंत मदत

झाली म्हणून मी ग्रंथालयातील ग्रंथपाल व इतर सेवक वर्गाचा ऋणी आहे.

या शोध प्रबंधाचे काम लवकर पूर्ण व्हावे यासाठी सातत्याने पाठ पुरावा करणारे आमचे मित्र, प्रा.शिवाजीराव व रमेश बाराते, चंद्रकांत टोंबरे, प्रा. जबुरे, प्रा. अशोक जाधव, श्री.वसंत विलास, रामेश्वर व किसन बाराते आदि मित्रांचा मी फार आभारी आहे.

मी एम्.फिल्. ही पदवी प्राप्त करावी अशी इच्छा असणारी माझी पत्नी सौ. मंगल बाराते हिने केलेल्या सहकार्यामुळेच मला हा शोध प्रबंधाचा प्रपंच पूर्ण करता आला आहे.

प्रबंधाच्या टंकलेखनाचे काम श्री. विष्णूपंत खाडे यांनी अल्पावधीतच सुबकपणे पूर्ण केले म्हणून त्यांचा मी ऋणी आहे.

आपला,

(काशिनाथ हा.बाराते)

कोल्हापूर:

दिनांक: 30-12-89

.....

# अ नु क्र म णि का


पृष्ठ क्रमांक

| | | |
|---|---|---|
| प्रकरण १ ले: | ऐतिहासिक पार्श्वभूमी | १ ते २७ |
| प्रकरण २ रे: | मिरज संस्थान प्रजा-परिषदेची स्थापना व तिच्या राजकीय चळवळीचे स्वरुप व उद्दिष्ठे. | २८ ते ९३ |
| प्रकरण ३ रे: | मिरज संस्थानांतील रयतेची साराबंदीची चळवळ | ९४ ते १४२ |
| प्रकरण ४ थे: | मिरज संस्थानांतील कायदेमंडळाचे स्वरुप, अधिकार व कार्य | १४३ ते १८९ |
| प्रकरण ५ वे: | मिरज संस्थानचे विलिनीकरण | १९० ते २२५ |
| प्रकरण ७ वे: | उ प सं हा र | २२६ ते २३८ |


......